मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रारूप विकास आराखडा सुनावणीला सुरुवात

## निगडीतील जनसुनावणीत शहराच्या विविध भागांतील नागरिकांचा सहभाग, विकास आराखड्याबाबत प्रत्यक्ष मांडल्या हरकती आणिसूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा परिपूर्ण, सुव्यवस्थित आणि संतुलित विकास साधण्यासाठी नागरिकांचे सक्रिय सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना शांततापूर्ण तसेच सकारात्मक मार्गाने मांडून महापालिकेला या विकास प्रवासात पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन 'प्रारूप सुधारित विकास योजना नियोजन समिती'चे सदस्य तथा स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केले आहे. निगडी प्राधिकरणातील ग. दी. माडगूळकर प्रेक्षागृह येथे महापालिकेच्या वतीने आयोजित 'प्रारूप विकास आराखडा २०२६' वरील जनसुनावणीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या बैठकीस विकास योजना नियोजन समितीचे सदस्य संदीप कस्पटे, सारिका गायकवाड, नगररचना विभागाचे उपसंचालक ललित खोब्रागडे, उपसंचालक अनुपमा कुलकर्णी, निवृत्त सहसंचालक प्रकाश भुक्ते, उत्तरेश्वर लोंढे, दत्तात्रय पवार, तसेच नामांकित वास्तू रचनाकार व पर्यावरण तज्ज्ञ नथू श्रीपती शिंदे हे प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी शहराच्या विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना समितीसमोर प्रत्यक्ष मांडल्या.

उपस्थितांना संबोधित करताना अभिषेक बारणे म्हणाले की, शहराच्या सुनियोजित विकासासाठी, अनियंत्रित वाढीला आळा घालण्यासाठी आणि नागरिकांना मूलभूत सुविधा सुनिश्चित करण्यासाठी 'प्रारूप विकास आराखडा २०२६' वेगाने पुढे नेला जात आहे. "नगररचना म्हणजेच 'टाऊन प्लॅनिंग' ही केवळ कागदावर नकाशे तयार करण्याची तांत्रिक प्रक्रिया नाही, तर तो शहराचा आजचा विकास आणि उद्याचे उज्ज्वल भवितव्य घडवणारा अत्यंत कळीचा मार्ग आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

हा आराखडा तयार करताना आगामी २० वर्षांच्या संभाव्य गरजा डोळ्यांसमोर ठेवण्यात आल्या असून रस्ते, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था, तसेच क्रीडा व मनोरंजनात्मक सुविधांसाठी योग्य ठिकाणी आणि अचूक प्रमाणात जमिनी आरक्षित करण्यात आल्या आहेत. शहराचे निवासी, व्यापारी, औद्योगिक, शैक्षणिक व ग्रीन झोनमध्ये वर्गीकरण केल्यामुळे निवासी भागांत होणाऱ्या अनधिकृत कारखानदारीवर पूर्णपणे बंदी घालणे शक्य होईल.



**"टाऊन प्लॅनिंग ही केवळ कागदावर रेषा मारण्याची प्रक्रिया नसून, एका भव्य आणि प्रगत शहराचे भविष्य उज्ज्वल घडवण्याचे ते एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. सुनियोजित विकासाच्या या पाऊलवाटेवर चालत पिंपरी-चिंचवडसारखी आधुनिक शहरे वेगाने विस्तारूनही राहण्यायोग्य आणि सर्वोत्तम राहू शकतात हे सिद्ध झाले आहे."**

**- अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती तथा प्रारूप सुधारित विकास योजना नियोजन समिती.**

### पर्यावरण संवर्धन काळाची गरज

**» पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देत शहरात 'ग्रीन बेल्ट' अंतर्गत पुरेशी जागा राखीव ठेवण्यात आली आहे. यामुळे झाडे, उद्याने, हवेशीर मैदाने आणि नदीकाठांचा सुयोग्य विकास करून शहराचे तापमान नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने नदीची पूररेषा व भूकंपप्रवण क्षेत्रे नकाशावर स्पष्ट दर्शवून तेथे अनधिकृत बांधकामांना कडक मनाई करण्यात आली आहे. तसेच, शहरातील प्रत्येक भागात शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये व उद्यानांचे समान वाटप करण्यात आले असून, यामुळे सामाजिक व भौगोलिक दरी कमी होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास समितीने व्यक्त केला.**

---

# पवना जलवाहिनी प्रकल्पाला मिळणार नवी दिशा; 13 जखमी शेतकऱ्यांच्या नोकरीच्या प्रस्तावामुळे हालचालींना वेग

## 15 वर्षांपासून रखडलेला प्रकल्प मार्गी लावण्यासाठी सरकारचे प्रयत्न; मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर फेरप्रस्ताव शासनाकडे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प तब्बल 15 वर्षांपासून ठप्प आहे. आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांवर झालेल्या गोळीबारात तीन जणांचा मृत्यू झाला. तर, 13 जण जखमी झाले. त्यापैकी जखमींना महापालिकेत नोकरी देण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे. तो फेरप्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठवला आहे. त्यांना नोकरी मिळाल्यास पवना जलवाहिनी प्रकल्प मार्गी लागू शकतो, असा विश्वास महापालिका प्रशासनाकडून व्यक्त केला जात आहे.



पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाच्या विरोधात मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवर बऊर टोलनाका येथे 9 ऑगस्ट 2011 ला रास्ता रोको आंदोलन केले होते. आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी गोळीबार केल्याने तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. तर, 13 जण जखमी झाले. त्या दिवसापासून तो प्रकल्प अपूर्ण स्थितीत बंद आहे. भारतीय किसान संघाने या प्रकल्पाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली जनहित याचिका फेटाळण्यात आली होती. त्या निर्णयाविरोधात भारतीय किसान संघाने 27 जानेवारी 2010 ला महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे (एमडब्ल्यूआरआरए) अपिल केले होते. प्राधिकरणाने 16 मे 2022 ला दिलेल्या आदेशानुसार महापालिकेने पवना नदीवर गहुंजे व शिवणे येथे कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधून दिला आहे. तसेच, आंदोलनात मृत्यू झालेल्या तीन शेतकऱ्यांच्या वारसांना महापालिकेत कायमस्वरूपी नोकरी दिली आहे.

दरम्यान, त्या प्रकल्पावरील स्थगिती राज्य सरकारने 8 सप्टेंबर 2023 ला उठवल्याने प्रकल्पातील मुख्य अडसर दूर झाला आहे. महापालिकेने प्रकल्पाचा सुधारित डीपीआर तयार केला आहे. त्यानुसार, हा 400 कोटी रुपयांचा प्रकल्प 1 हजार 200 कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोहचला आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत नुकतीच बैठक झाली. त्यात शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते.

# लोणावळ्यात वाहतूक कोंडीचा विळखा; 5 मिनिटांच्या अंतरासाठी लागताहेत तब्बल एक तास

## मावळा पुतळा चौक बनला कोंडीचा अड्डा; रस्त्यावरील पार्किंग, अतिक्रमणे आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील मावळा पुतळा चौक मागील काही दिवसांपासून वाहतूक कोंडीचा अड्डा बनला आहे. या ठिकाणी तीनही बाजूने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्यामुळे स्थानिक नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. पाच ते दहा मिनिटांचे अंतर पार करण्यासाठी नागरिकांना पाऊण ते एक तासाचा कालावधी लागत आहे.

या कोंडीवर नियंत्रण ठेवण्याचे कोणतेही धोरण पोलिस प्रशासन व नगर परिषदेने अंमलात आणलेले नाही. दिवसेंदिवस या ठिकाणी होत असलेली कोंडी हे सर्वसामान्य नागरिकांसाठी अक्षरशः डोकेदुखी ठरू लागली आहे. शाळेतील मुलांना घेण्यासाठी व त्यांना शाळेमध्ये सोडण्यासाठी येणाऱ्या पालकांना व स्कूल व्हॅन चालकांना या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक सामना करावा लागत आहे

शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी कोणतीही दीर्घकालीन उपाययोजना लोणावळा नगर परिषदेने व शहर पोलिसांनी तयार केलेली नाही. शहरातील अरुंद रस्ते, जागा मिळेल त्या ठिकाणी वाहने उभी करण्याची अंगवळणी पडलेली सवय, आम्ही स्थानिक आहोत या आविर्भावात दुकानांसमोर वाहने उभी केली जात आहेत. याचेच अनुकरण आता शहरात येणारे पर्यटकदेखील करू लागले आहेत.

लोणावळा शहरामध्ये वाहनांची दिवसेंदिवस वाढत असलेली संख्या, रस्त्यावर झालेली अतिक्रमणे, हॉटेल व दुकान व्यावसायिकांचे रस्त्यावरच लावण्यात आलेले लोखंडी बोर्ड व जागा मिळेल त्या ठिकाणी होत असलेले रिक्षा व टुरिस्ट वाहनांचे स्टॅन्ड यामुळे नागरिकांना रस्त्यावरून चालणे मुश्किल बनले आहे. लोणावळा शहरामध्ये वाहने उभी करण्यासाठी कोठेही जागा उपलब्ध नाही. मात्र, आता रस्त्यावरून वाहने चालवणेदेखील डोकेदुखी ठरू लागले आहे. अवघ्या पाच ते दहा मिनिटांच्या अंतरासाठी नागरिकांना किमान पाऊण ते एक तास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. मागील महिनाभरापासून शहरामध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे अनेक नागरिक आपल्या चारचाकी वाहनांमधून बाजारात जाण्याचा प्रयत्न करतात. मात्र, वाहतूक कोंडीने अक्षरक्षा: त्यांचे कंबरडे मोडले आहे. आठवड्याचे सातही दिवस बाजारपेठेमध्ये वाहतूक कोंडी होऊ लागली आहे.



### वीकेंडला लागताहेत वाहनांच्या रांगा

» शहरामध्ये पावसाळी पर्यटनासाठी पर्यटक येत असतात. यामुळे शनिवार व रविवारी होणारी कोंडी ही सर्वश्रुत बनली आहे. मात्र, याव्यतिरिक्त सोमवार ते शुक्रवार या वीक डेच्या काळामध्ये होणारी कोंडी मात्र मनस्ताप देणारी ठरत आहे. मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर वर्षाचे 365 दिवस वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळते. आता शहरामध्ये व शहरातील अंतर्गत चौकांमध्येदेखील हीच परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. वाहनचालकांचा बेशिस्तपणा, पोलिसांचा वेळकाढूपणा व नगर परिषदेचे या सर्व गोष्टींकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष याचा त्रास हा शहरातील नागरिकांना सहन करावा लागत आहे.

### वाहतूक नियंत्रणासाठी बारा वॉर्डन

» लोणावळा नगर परिषदेने वाहतूक नियंत्रणासाठी पोलिसांना मदतनीस म्हणून बारा वॉर्डन दिले आहेत. यापैकी निम्म्यापेक्षा जास्त वॉर्डन हे मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरच काम करण्यात समाधान मानत आहेत. मुख्य बाजारपेठेमधील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी ना कोणी वॉर्डन उपलब्ध असतात ना पोलिस कर्मचारी. शहर पोलिस ठाण्याच्या निरीक्षक पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन पाटील यांनी शहरातील वाहतुकीच्या समस्येला प्राधान्य क्रमाने सोडवणार असल्याचे म्हटले होते. प्रत्यक्षात मात्र असे काही होताना दिसत नाही.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 10 लाख वाहने एचएसआरपीविना; आरटीओची दंडात्मक कारवाई सुरू

## चार वेळा मुदतवाढीनंतरही वाहनधारकांचा प्रतिसाद कमी; एचएसआरपी नसल्यास पहिल्यांदा 1 हजार, पुन्हा उल्लंघन केल्यास 10 हजारांपर्यंत दंड

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाने वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविणे अनिवार्य केले आहे. सर्व वाहनधारकांना बसविण्यास गैरसुविधा होऊ नये, म्हणून शासनाकडून चार वेळा मुदतवाढ देण्यात आली. तरीदेखील शहरात सुमारे दहा लाख वाहने विना एचएसआरपी रस्त्यावरून धावत आहेत.

त्यामुळे नंबरप्लेट न बदलणाऱ्या वाहनांवर पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओने ) कारवाई सुरू केली आहे. परिवहन विभागाने राज्यातील एक एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना एचएसआरपी बसवणे बंधनकारक केले आहे. तर, एक जानेवारी २०२५ पासून या नव्या नंबरप्लेट बसविण्याची सुविधा सुरू करण्यात आली.

वारंवार मुदतवाढ देऊनही एचएसआरपीला मिळणारा अल्प प्रतिसाद लक्षात घेता परिवहन विभागाने १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांचे हस्तांतरण, नोंदणी, प्रमाणपत्रामध्ये पत्ता बदल करणे, वित्त बोजा चढविणे, उतरविणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे, ना - हरकत प्रमाणपत्र जारी करणे, वाहनांमध्ये बदल करणे, आदी वाहनाविषयक सर्व कामकाज एचएसआरपी बसविल्याशिवाय १६ जून २०२५ पासून करण्यास मनाई केली होती. त्यानंतरही वाहनधारकांनी एचएसआरपी बसविण्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले.

पिंपरी-चिंचवड आरटीओमध्ये एकून २५ लाख वाहनांची नोंद आहे. यामध्ये १५ लाख ३९ हजार वाहने २०१९ पूर्वीची आहेत. यापैकी केवळ सात लाख वाहनधारकांची एचएसआरपीसीसाठी नोंद केली होती. यातील सुमारे पाच लाख ४७ हजार ३१४ वाहनांवर एचएसआरपी नंबरप्लेट बसवण्यात आल्या आहेत, तर सुमारे दहा लाख वाहनांवर अद्याप एचएसआरपी बसवलेल्या नाहीत. एचएसआरपी नंबर प्लेट नसल्यास पहिल्यांदा एक हजार रुपये दंड. दुसऱ्यावेळी या नियमाचे उल्लंघन केल्यास पाच ते दहा हजार रुपयापर्यंत दंड भरावा लागतो.




> एचएसआरपी नंबर प्लेटसाठी वारंवार मुदत वाढ देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात होते. पहिल्यांदा १५ ऑगस्ट २०२५ , त्यानंतर ३० नोव्हेंबर २०२५, तिसऱ्यांदा ३१ डिसेंबर २०२५ आणि ३० जून २०२६ पर्यंत अशी चार वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. तरीही अनेक वाहनधारकांनी नवीन नंबरप्लेट बसविण्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे आता योग्य ती कारवाई केली जाणार आहे.
>
> - राहुल जाधव उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड.

# पुणेकरांना मोठा दिलासा! शहरातील पाणीकपात अखेर पूर्णपणे रद्द

## खडकवासला, पानशेत आणि वरसगाव धरणे 100 टक्के भरली; टेमघरमध्ये 98 टक्के पाणीसाठा, आता नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांसाठी अत्यंत आनंदाची बातमी समोर आली आहे. पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा जमा झाल्यामुळे शहरातील लागू असलेली पाणीकपात पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. पुणे महापालिका आयुक्तांनी यासंदर्भातील अधिकृत माहिती दिली.

पुण्याला पाणीपुरवठा करणारी प्रमुख धरणे सुमारे १०० टक्के भरली आहेत. खडकवासला, पानशेत आणि वरसगाव ही धरणे पूर्णपणे (१०० टक्के) भरली असून टेमघर धरण ९८ टक्के भरले आहे. धरणांमधील या समाधानकारक साठ्यामुळे पालिकेने अखेर पाणीकपात मागे घेण्याचा निर्णय घेतला असून, आता शहरात नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा केला जाणार आहे.

जूनच्या सुरुवातीला पाऊस लांबल्याने खडकवासला प्रकल्पातील पाणीसाठा खालावला होता. त्यामुळे महापालिकेने १५ जूनपासून शहरात पाणीकपात लागू केली होती. त्यानंतर २२ जुलै रोजी पुन्हा आढावा घेतला जाणार होता, मात्र निर्णय लांबल्याने पुणेकरांनी संताप व्यक्त केला होता. अखेर जुलैअखेर आणि ऑगस्टच्या सुरुवातीला घाटमाथ्यावर झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणांनी गाठलेली शंभरी पाहता हा दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे.

पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला, पानशेत आणि वरसगाव धरणांनी १०० टक्के पाणीसाठा गाठला असून टेमघर धरणात ९८ टक्के पाणी साठले आहे. घाटमाथ्यावर झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणांमध्ये मुबलक पाणी जमा झाले. त्यामुळे आगामी काळातील शहराच्या पाणीपुरवठ्याबाबतची चिंता दूर झाली असून प्रशासनाने नियमित पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक नियोजन सुरू केले आहे. धरणांतील समाधानकारक साठ्यामुळे पुणेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महापालिकेने १५ जूनपासून लागू केलेली पाणीकपात अखेर पूर्णपणे रद्द केली आहे. जूनमध्ये पाऊस उशिरा झाल्याने पाणीसाठा कमी झाला होता आणि खबरदारी म्हणून कपात लागू करण्यात आली होती. मात्र जुलैअखेर झालेल्या जोरदार पावसामुळे धरणे भरल्याने हा निर्णय मागे घेण्यात आला. आता शहरात पूर्ववत, नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा होणार असल्याची अधिकृत माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.



### पाणीकपात अखेर रद्द

» महापालिकेने १५ जूनपासून लागू केलेली पाणीकपात अखेर पूर्णपणे रद्द केली आहे. जूनमध्ये पाऊस उशिरा झाल्याने पाणीसाठा कमी झाला होता आणि खबरदारी म्हणून कपात लागू करण्यात आली होती. मात्र जुलैअखेर झालेल्या जोरदार पावसामुळे धरणे भरल्याने हा निर्णय मागे घेण्यात आला. आता शहरात पूर्ववत, नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा होणार असल्याची अधिकृत माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.

### धरणे शंभर टक्के भरली

» पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला, पानशेत आणि वरसगाव धरणांनी १०० टक्के पाणीसाठा गाठला असून टेमघर धरणात ९८ टक्के पाणी साठले आहे. घाटमाथ्यावर झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणांमध्ये मुबलक पाणी जमा झाले. त्यामुळे आगामी काळातील शहराच्या पाणीपुरवठ्याबाबतची चिंता दूर झाली असून प्रशासनाने नियमित पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक नियोजन सुरू केले आहे. धरणांतील समाधानकारक साठ्यामुळे पुणेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### पुणेकरांना मोठा दिलासा

» धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा झाल्यामुळे पुणेकरांना पाणीटंचाईच्या चिंतेतून मोठा दिलासा मिळाला आहे. पाणीकपात संपुष्टात आल्याने नागरिकांना नियमित पाणी मिळणार असून दैनंदिन जीवन अधिक सुरळीत होणार आहे. पावसामुळे जलसाठा समाधानकारक झाल्याने महापालिकेने पाणीपुरवठ्याचे नियोजन पूर्ववत करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे घरगुती वापरासह व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रालाही मोठा फायदा होणार आहे.

# पुणेकरांचा प्रवास महागणार! रिक्षा भाडेवाढीला 'RTA'ची मंजुरी; लवकरच नवे दर होणार जाहीर

## पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात रिक्षाने प्रवास करणाऱ्या नागरिकांना महागाईचा आणखी एक झटका बसणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महागाईच्या वाढत्या झळांमुळे त्रस्त असलेल्या पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना आता रिक्षा प्रवासासाठीही जास्त पैसे मोजावे लागणार आहेत. पुणे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने (आरटीए) रिक्षा भाडेवाढीला मंजुरी दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली 'आरटीए'ची बैठक झाली. या बैठकीत रिक्षाच्या भाडेवाढीबाबत चर्चा करण्यात आली. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) अद्याप भाडेवाढ जाहीर करण्यात आलेली नाही. येत्या दोन दिवसात नवीन भाडे दर जाहीर करणार असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी सांगितले.

पुण्यात पहिल्या १.५ किलोमीटर प्रवासातही २५ रुपये आणि त्यानंतर १७ रुपये प्रती किलोमीटर असा दर आकारण्यात येतो. आता मात्र नवीन दरानुसार हे भाडे वाढणार असल्याची शक्यता आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्षा संघटनांकडून भाडेवाढीची मागणी करण्यात येत होती. सीएनजीच्या किमतीत झालेली मोठी वाढ, वाहनांच्या सुट्या भागांचे वाढलेले दर, विमा, देखभाल आणि दुरुस्तीवरील वाढता खर्च तसेच सर्वसाधारण महागाईमुळे सध्याच्या भाडेदरात व्यवसाय करणे परवडत नसल्याचे संघटनांचे म्हणणे होते. या पार्श्वभूमीवर 'आरटीए'च्या बैठकीत चर्चा करण्यात आली.

पुण्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत रिक्षांचा मोठा वाटा आहे. पुणे शहर आणि परिसरात साधारण दीड लाखांच्या आसपास रिक्षा धावतात. त्यामुळे दररोज लाखो प्रवासी रिक्षाने प्रवास करतात. रिक्षाच्या भाडेवाढीचा सर्वाधिक फटका दैनंदिन प्रवास करणाऱ्या नोकरदार, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना बसणार आहे. शाळा, कॉलेज, कार्यालयात जाण्यासाठी रिक्षेचा वापर करणाऱ्यांचा मासिक खर्च वाढणार आहे. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून कोणतीही भाडेवाढ न झाल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या रिक्षाचालकांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरणार असल्याचीही भावना व्यक्त करण्यात येत आहे.



> 'आरटीए'ची बैठक चांगली झाली. या बैठकीत पुण्यातील वाहतुकीसंदर्भात वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यात आली. भाडेवाढीचा निर्णय अद्याप जाहीर करण्यात आला नाही. लवकरच हा निर्णय जाहीर करण्यात येईल
>
> - अर्चना गायकवाड, प्रादेशिक परिवहन अधिकारी

# सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलानंतरही कोंडी काही सुटेना

## धायरी, नऱ्हे, नांदेड सिटीच्या पुणेकरांचे हाल; वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महापालिका अन् पोलिसांची तातडीची बैठक होणार.

**पुणे | प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महापालिकेने तब्बल १२० कोटी रूपये खर्चून उड्डाणपूल उभारला तरी वाहतूक कोंडी सुटलेली नाही. पोलिसांचे ढिसाळ नियोजन, रस्त्यावरील खड्डे, अतिक्रमणे, अनधिकृत पार्किंगमुळे वीर बाजी पासलकर चौक ते राजारामपुलापर्यंतच्या दोन किलोमीटरच्या अंतरासाठी पुणेकरांना एक ते दीड तास वाहतूक कोंडीशी झुंजावे लागते.

एकूणच, सव्वाशे कोटी खर्चानंतरही सिंहगड रस्ता परिसरातील नागरिकांचा मनस्ताप काही संपलेला नाही. धक्कादायक बाब म्हणजे ही वाहतूक कोंडी होताना ती सोडविण्याची पोलिसांना गरज वाटत नाही. दुसरीकडे उड्डाणपूलाच्या श्रेयासाठी धडपडणारे लोक प्रतिनिधी याबाबत कमालीचे उदासिन आहेत. यामुळे विद्यार्थी, नोकरदार, रूग्णवाहिका, तसेच दैनंदिन कामासाठी पुण्यात येणारे सामान्य नागरिकांना १२० कोटींचा विकतचा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

धायरी, नऱ्हे, किरकटवाडी, कोल्हेवाडी, नांदेड सिटी या भागात गेल्या दहा वर्षात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले वाढले आहे. यामुळे येथील नागरीकांना शहरात ये-जा करण्यासाठी हा एकमेव रस्ता आहे. त्याला कोणताही पर्यायी रस्ता नाही. उड्डाणपुलापूर्वी येथे सतत वाहतूक कोंडी होत होती. त्यावेळी या रस्त्यावर ताशी अवघा ९ किलोमीटरचा सरासरी वेग होता.

त्यामुळे पालिकेने राजारामपूल ते फनटाईमपर्यंत दुहेरी दोन उड्डाणपूल उभारले. पुलाचे काम झाल्यानंतर चार सिग्नल कमी झाले. त्यामुळे वाहनांचा ३० ते ३५ मिनिटांचा वेळ अवघ्या ४ मिनिटांवर आला. पुलानंतर वाहतूक नियोजनासाठीच्या पोलिसांची संख्या कमी केली. दुसरीकडे राजारामपूल चौकात बॉटलनेक स्थिती झाली आहे.

सकाळी येथून शहरात येणारी ८० टक्के वाहने कर्वे नगरकडे वळतात. २० टक्केच स्वारगेटकडे जातात. त्याच वेळी कर्वेनगरच्या बाजूला राजाराम पूल संपल्यानंतर ही वाहने ज्या रस्त्याने जातात, तेथे १०० मीटर मध्ये तीन वेगवेगळया दिशेने वाहने येतात परिणामी मातोश्री वृध्दाश्रमाच्या दारातील कोंडी थेट सिंहगड रस्त्यावरील नांदेड सिटीपर्यंत पोहचते. सोमवारीही सकाळी या रस्त्यावर सकाळी ८ ते दुपारी बारापर्यंत तब्बल ४ तास वाहतूक कोंडी होती.



### खड्डे, अतिक्रमणे, जड वाहतूक

» उड्डाणपूल झाला तरी पुलाखालील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. पुलावर वाहतूक कोंडी झाल्यानंतर वाहनचालक खाली रस्त्यावर येतात. या रस्त्यावर माणिकबाग चौक, हिंगणे चौक, प्रकाश इमानदार चौकात मोठ्या प्रमाणावर रस्त्यावरच वाहने पार्क केलेली असताततसेच रस्त्यावरील खड्डयांमुळे वाहने संथ गतीने जातात. रस्त्यावर वर्दळीच्या वेळी जड वाहतुकीला बंदी असली तरी रेडीमिक्स ट्रक, हायवा, राडारोडा घेवून जाणारे मोठे ट्रक राजरोसपणे रस्त्यावरून ये-जा करतात. त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याने पुलावर आणि खालीही कोंडी होते

> "गेल्या काही दिवसांपासून या रस्त्यावर सतत वाहतूक कोंडी होत असून नागरिकांच्याही मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत. याबाबत पुढील दोन दिवसात वाहतूक पोलीस आणि पालिकेच्या वाहतूक नियोजन विभागाची एकत्रित बैठक घेतली जाणार आहे."
>
> \- मंजूषा नागपुरे, महापौर, पुणे महापालिका.

> "पावसामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने चारचाकी वाहने काढतात. त्यातच, रस्त्यांवर असंख्य खड्डे असल्याने नागरीक रस्ता मिळेल तेथे वाहने दामटतात. त्यामुळे कोंडी होते. ती सोडविण्यासाठी लवकरच उपाय योजना करणार आहे.
>
> \- राहूल गौड, वाहतूक पोलीस निरीक्षक

# कर्जमुक्तीसाठी ॲग्रीस्टॅक- आधार प्रमाणीकरण बंधनकारक; नोंदणी कोठे करावी, आवश्यक कागदपत्रे कोणती?

## अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-2026चा लाभ मिळवण्यासाठी ॲग्रीस्टॅक व आधार प्रमाणीकरण त्वरित पूर्ण करण्याचे प्रशासनाचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हा उपनिबंधक (पुणे ग्रामीण) प्रकाश जगताप यांनी सर्व सहाय्यक निबंधकांना दिल्या आहेत. तसेच ज्या शेतकऱ्यांनी अद्यापपर्यंत ॲग्रीस्टॅक काढलेले नाहीत, अशा शेतकऱ्यांनी तात्काळ ॲग्रीस्टॅक नंबर काढून आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असेही आवाहनही त्यांनी केले आहे.

जिल्ह्यात अद्याप ८ हजार ७४९ शेतकऱ्यांकडे ॲग्रीस्टॅक नसल्यामुळे आधार प्रमाणीकरण झालेले नाही. यामध्ये दौंड (११२६), इंदापूर (१२३२), भोर (१०३१), खेड (९३१), मावळ (७९५), शिरूर (६४५), जुन्नर (६४१), बारामती (६०८), हवेली (५९९), पुरंदर (५२४), आंबेगाव (२२९), वेल्हे (१७६), मुळशी (१३४) आणि पुणे (७८) याप्रमाणे आहे

तसेच ॲग्रीस्टॅक असलेल्या मात्र, अद्यापही आधार प्रमाणीकरण न झालेल्या शेतकऱ्यांची संख्या ९ हजार ३८२ असून त्यामध्ये दौंड (१,५९७), इंदापूर (१,४६१), बारामती (९२२), भोर (९००), हवेली (८२१), पुरंदर (७५५), खेड (६४०), शिरूर (६१६), जुन्नर (४६४), मावळ (३७३), वेल्हे (३३८), पुणे (२९१), आंबेगाव (१३६) आणि मुळशी (६८) याप्रमाणे आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हा उपनिबंधक (पुणे ग्रामीण) प्रकाश जगताप यांनी सर्व सहाय्यक निबंधकांना दिल्या आहेत. तसेच ज्या शेतकऱ्यांनी अद्यापपर्यंत ॲग्रीस्टॅक काढलेले नाहीत, अशा शेतकऱ्यांनी तात्काळ ॲग्रीस्टॅक नंबर काढून आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असेही आवाहनही त्यांनी केले आहे.

तरी सर्व सहाय्यक निबंधकांना त्यांच्या तालुक्यातील संबंधित शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्यादृष्टीने शिबिराचे आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. ही बाब शेतकरी कर्जमुक्तीशी संबंधित असल्याने कोणताही पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहू नये, यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, अशाही सूचना जगताप यांनी दिल्या आहेत.



### शेतकऱ्यांना ॲग्री स्टॅक फार्मर आयडी

» केंद्र व राज्य शासनाच्या 'ॲग्रीस्टॅक डिजिटल कृषी मिशन' अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याचा युनिक फार्मर आयडी तयार करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. शासकीय योजनांचा शेतकऱ्यांना फार्मर आयडी आवश्यक आहे.